लोक अदालतीसमोर भूसंदर्भ तडजोडीसाठी सादर करणेबाबत.

## महाराष्ट्र शासन
## महसूल व वन विभाग
## शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१७/PIL-३४/प्र.क्र.१०४/भाग-१/अ-४.

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा</u>- (१) शासन निर्णय क्र.एलक्यूएन ०१/२०१८/प्रक्र.३०/अ-२, दिनांक १३ ऑक्टोबर,२०११.
(२) शासन परिपत्रक क्र. एलक्यूएन ०१/२०१८/प्रक्र.३०/अ-२, दिनांक १७ डिसेंबर,२०११.
(३) शासन शुध्दीपत्रक क्र.एलक्यूएन ०१/२०१८/प्रक्र.३०/अ-२, दिनांक १८ फेब्रुवारी,२०१२.

**प्रस्तावना :-**

मा.लोक अदालतीसमोर तडजोडीसाठी भूसंदर्भ सादर करुन जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांना प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार तडजोड करण्यासाठी वरील शासन निर्णय / परिपत्रकान्वये निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार लोक अदालतीसमोर तडजोड झाल्यानंतर तडजोडीची रक्कम कोणत्याही परिस्थितीत सहा महिन्याच्या आत उपलब्ध करुन देण्यासाठी नमूद करण्यात आलेले आहे.

तथापि, मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.३४/२०१७ मध्ये मा. न्यायालयाने दि. ११ सप्टेंबर, २०१७ रोजी दिलेल्या आदेशामध्ये शासनाने लोक अदालतीसमोर जास्तीत जास्त प्रकरणे घेऊन त्यामध्ये तडजोड करण्यासाठी आवश्यक ते आदेश निर्गमित केलेले आहेत. परंतु संबंधित संपादक संस्था यामध्ये गंभीरतेने कार्यवाही करीत नसल्यामुळे लोक अदालतीसमोर जास्तीत जास्त प्रकरणे घेऊन तडजोड करण्याची कार्यवाही केली जात नाही. तसेच ज्या प्रकरणांमध्ये तडजोड करण्यात आलेली आहे. त्या प्रकरणांमध्ये आवश्यक तो निधी विहित कालावधीत उपलब्ध करुन दिला जात नाही, असा निष्कर्ष नोंदविण्यात आलेला आहे. सदर जनहित याचिकेच्या अनुषंगाने मा. न्यायालयाने नमुद केलेल्या निष्कर्षाचा सर्वंकष विचार करुन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक:-**

मा.लोक अदालतीसमोर तडजोडीसाठी भूसंदर्भ सादर करुन जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांना प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार तडजोड करण्यासाठी आवश्यक त्या सूचना शासनाने संदर्भाधीन शासन निर्णय / परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यामधील निर्देश / सूचना यांचे काटेकोरपणे पालन करुन संबंधित संपादक संस्था यांनी मा.लोक अदालतीसमोर जास्तीत जास्त प्रकरणे सादर करुन त्यामध्ये तडजोड घडवून आणण्याची कार्यवाही दक्षतेने करण्यात यावी. ज्यायोगे १५ % व्याजाचा भूर्दंड शासनावर पडून त्याचा बोजा शासन तिजोरीवर येणार नाही, याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी अन्यथा असे काही आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या

बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५नुसार त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच मा.लोक अदालतीसमोर तडजोड करण्यात आलेल्या प्रकरणाशी निगडित निधी संबंधीत संपादक संस्था यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे विहित कालावधीत भरणा करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. विहित कालावधीत निधीचा भरणा करण्यात आल्यास संबंधित भूधारकांना मा.न्यायालयात दावे दाखल करणे भाग पडणार नाही.

तरी सर्व प्रशासकीय विभाग / संपादक सस्था यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अधिनस्त क्षेत्रिय अधिका-यांच्या निदर्शनास आणण्याची विनाविलंब कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०२२८१३१७११६८१९ असा आहे.सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash K Gawade

Digitally signed by Subhash K Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=40b8b2876e2135f5b158b877f59754b2a7ddf64e0cf59f2dc33ad60b8bce5bcd, cn=Subhash K Gawade
Date: 2018.02.28 17:06:22 +05'30'

**( सु. कि. गावडे )**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
२) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (वित्त व वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव , मंत्रालय, मुंबई.
७) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८) सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व विभागीय आयुक्त.
१०) सर्व जिल्हाधिकारी.
११) सर्व जिल्हा सरकारी वकील.
१२) निवडनस्ती (अ-४)
१३) कार्यासन अ-१, अ-२,अ-३,अ-४.